Marketing and Publicity Dept.,
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614366
cmmedia@mahabank.co.in; media@mahabank.co.in

प्रसिद्धीसाठी

# बँक ऑफ महाराष्ट्रने रेपो लिंक कर्ज व्याजदरात 40 अंकांनी तर एमसीएलआरमधे 20 अंकांनी घट केली

**पुणे, जून 5, 2020**: देशातील प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील एक, बँक ऑफ महाराष्ट्रने (बीओएम) आपल्या रेपो लिंक्ड कर्ज व्याजदरामध्ये (आरएलएलआर) मध्ये 40 बीपीएस अंकांनी घट केली आहे. त्यानुसार दिनांक 8 जून 2020 पासून बँकेच्या रेपो लिंक कर्ज व्याजदरामधे (आरएलएलआर) कपात होवून तो आता 7.05% करण्यात आला आहे.

कर्ज दरातील झालेल्या या कपातीमुळे आता सर्व किरकोळ कर्जे जसे की, गृह, शिक्षण, वाहन आदींसह सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) यांची आरएलएलआरशी जोडलेली कर्जे आता स्वस्त दरात उपलब्ध होतील आणि पर्यायाने याचा फायदा किरकोळ व एमएसएमई कर्जदारांना होईल.

सलग तिसऱ्या महिन्यात बँकेने निधी आधारीत कर्ज व्याजदर (एमसीएलआर) देखील कमी केलेला आहे. हा विविध कालावधीतील निधी आधारीत कर्ज व्याजदर (एमसीएलआर) दिनांक 08 जून 2020 पासून प्रचलित दरापेक्षा 20 अंकांनी कमी करण्यात आला आहे.

बँकेचा ओव्हरनाईट, एक महिन्याचा निधी आधारित कर्ज व्याजदर (एमसीएलआर) अनुक्रमे 7.20% (पूर्वीचा 7.40%) आणि 7.30% (पूर्वीचा 7.50%) तर तीन महीने आणि सहा महिन्यांचा निधी आधारित कर्ज व्याजदर (एमसीएलआर) 7.40% (पूर्वीचा 7.60%) आणि 7.50% (पूर्वीचा 7.70%) करण्यात आला आहे. एक वर्षाचा निधी आधारित कर्ज व्याजदर (एमसीएलआर) 7.70% (पूर्वीचा 7.90%) झाला आहे.

बँकेचे एमसीएलआरमधील कपात करण्याचे उद्दीष्ट आर्थिक विकासास आणि औद्योगिक विकासास समर्थन देणे आणि दर संप्रेषण सुनिश्चित करणे हे आहे.